# माळशिरचा जांगडगुत्ता









# सातपुते गॅसवर तर जानकर ऑक्सिजनवर!

✔ सोलापूर/प्रतिनिधी

**माढा लोकसभेच्या निवडणुकीपासून अधिकच चर्चेत आलेल्या माळशिरस तालुक्याच्या विधानसभेच्या जागेचा जांगडगुत्ता शुक्रवार (ता.२५) पर्यंत कायम राहिल्याचं चित्र रात्री उशीरापर्यत राहिला.राष्ट्रवादी शरचंद्र पवार गटानं उत्तम जानकर यांना तर भाजपकडून आमदार राम सातपुतेंना अद्याप उमेदवारी न देता ऑक्सीजनवर ठेवल्याची वस्तुस्थिती आहे.**

उत्तम जानकर यांची उमेदवारी निश्चित मानली जात आहे. माढा लोकसभेच्या निवडणुकीवेळी त्यांच्या उमेदवारीबद्दल सर्व काही ओके असं ठरलं होते. अपेक्षानुसार, राष्ट्रवादी शरदचंद्र पवार गटाच्या पहिल्या यादीत उत्तम जानकर यांचं नाव येणं गरजेचं होतं. मात्र, तसं झालं नाही. या यादीत नाव नाही आलं.

दुसऱ्या बाजूला महायुतीमधील घटक पक्ष भाजपतर्फे आमदार राम सातपुते यांना पुन्हा उमेदवार मिळेल, असं निश्चितपणं सांगितलं होतं. मात्र त्यांच्याबाबतीत वेगळं झालं. भाजपनं विद्यमान आमदारांचा समावेश असलेली जी पहिली यादी जाहीर केली त्यामध्ये आमदार सातपुते यांचे नाव आलं नाही. सातपुते यांच्या नावाला या मतदार संघामधील सर्वच भाजप पदाधिकाऱ्यांचा विरोध असल्याने त्यांची उमेदवारी मागे ठेवण्यात आल्याचं विश्वसनीयरित्या सांगण्यात आलं.

पहिल्या यादीत उमदेवारी डावलल्यानंतर आमदार सातपुते यांनी मुंबईत उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सागर बंगल्यावर जाऊन भेट घेतली. त्यानंतही त्यांच्या उमेदवारीचा कोठेच बोलबाला झाली नाही.

### फिक्सच उमेदवारच वेटिंगवर

उत्तम जानकर आणि राम सातपुते हे दोघे माळशिरस विधानसभेच्या मतदार संघातून उमेदवारीचे प्रबळ दावेदार आहेत. मात्र या दोघांच्या उमेदवारीच्या अनुषंगाने, मागच्या काही दिवसांपासून वेटिंगवर राहावं लागत आहे.

# राजीनामा मंजूर

## पण उमेश पाटलांच्या प्रवेशाचं त्रांगडं

✔ सोलापूर/प्रतिनिधी

**उमेश पाटील यांनी दिलेला अजित पवार राष्ट्रवादी गटाच्या मुख्य प्रदेश प्रवक्ते पदाचा राजीनामा अखेर मंजूर करण्यात आला आहे. राजीनामा मंजूर केल्याचं या पक्षाचे सरचिटणीस आमदार शिवाजीराव गर्जे यांनी उमेश पाटील यांना तसं पत्राद्वारे कळवलं आहे. गुरुवार (ता.२४) त्यांचा राजीनामा मंजूरी केल्याचं पत्रात नमुद आहे. राजीनामा मंजूर झाल्यानंतर पाटील यांचा राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षात जाण्याचा मार्ग मोकळा झाला असला तरी शुक्रवार (ता.२५) पर्यत त्यांच्या पक्षांतरांचं त्रागंड कायम होतं.**

शरद पवार, जयंत पाटील, सुप्रिया सुळे यांच्याशी उमेश पाटील यांच्या पक्ष प्रवेशसंबंधी चर्चा झाली होती. पक्ष प्रवेशाचं बारसं करण्याचंदेखील ठरलं होतं. मुंबईत वाय.जी.चव्हाण सेंटरला पक्ष प्रवेशाचं ठरलं होतं.

तथापि, याच टप्यावर रोहित पवार यांनी उमेश पाटील यांच्या पक्ष प्रवेशाबद्दल खो घातला. तरीही उमेश पाटील यांचं शरद पवार यांच्याकडे जाणं तीन दिवस कायम राहिलं. मात्र प्रवेशाचं घोडं दामटवलं गेलं नाही.

### विरोधी अनगरकर गटात मात्र आनंदाच्या उकळ्या

उमेश पाटील यांनी अजित पवार गटाला दिलेली कायमची सोडचिठ्ठी, उमेश पाटलांचा मंजूर झालेला राजीनामा आणि दुसरीकडे उमेश पाटलांच्या राष्ट्रवादी शरद पवार गटातील उमेदवारीला या गटाचे नेते रोहित पवार यांनी लावलेल ब्रेक, उमेश पाटील यांच्या पक्ष प्रवेशाचे झालेले त्रांगडे, रखडलेला पक्ष प्रवेश या सगळ्या घडामोडी पाहता अनगरकर पाटील समर्थक गटामध्ये मात्र आनंदाच्या उकळ्या फुटत आहेत.

अजित पवार राष्ट्रवादी गटाच्या मुख्य प्रदेश प्रवक्ता पदाचा राजीनामा माझा मंजूर झाला आहे. या पदाच्या जबाबदारीमधून मी



मुक्त झालो आहे. राष्ट्रवादी शरचंद्र पवार गटात माझा प्रवेश होईल, ते मला महत्त्वाचं नाही. मोहोळ विधानसभेची निवडणूक आणि तिथला उमेदवार निवडून आणणं महत्त्वाचं आहे. माझ्या पक्ष प्रवेशावर रोहित पाटील यांनी दिलेल्या प्रतिक्रियेवर शरद पवार यांच्याशी मी चर्चा केली आहे. 'राष्ट्रवादी शरचंद्र पवार पक्षात मी येऊ का नको, असे रोहित पवार यांनाच आपण विचारा, भविष्यात मला काम करताना अडचण नको' असे आपण शरद पवार यांना सांगितलं आहे. प्रदेश प्रवक्ता म्हणून माझी जबाबदारी मी त्यावेळी पार पाडली आहे. मी मॅनेज होणारा नाही. विरोधकांवर हल्लाबोल करणं हे माझं या पदावर काम करताना नैतिक कर्तव्य होतं ते मी केलं आहे. रोहित पवार हे त्यांच्या मतदार संघात होते. माझ्या पक्ष प्रवेशाबद्दल शरद पवार, जयंत पाटील आणि सुप्रिया सुळे यांच्याशी झालेल्या चर्चेबद्दल त्यांना माहिती नसावी म्हणून ते तसे बोलले असावे.

– **उमेश पाटील**, नरखेडकर



# अभिजीतआबा, बबनदादा, क्षीरसागरांचा मुंबईतच तंबू!

✔ सोलापूर/प्रतिनिधी

राष्ट्रवादी शरदचंद्र पवार गटाचं तुतारी चिन्ह घेऊन विधानसभेच्या निवडणुकीत आमदार होण्याचं नशिब आजमावण्यासाठी धडपडणाऱ्या सोलापूर जिल्ह्यातील माढ्याचे आमदार बबनराव शिंदे, श्री विठ्ठल कारखान्याचे अध्यक्ष अभिजित पाटील, शरद पवार गटाचे मोहोळचे नेते संजय क्षीरसागर आदींनी मागच्या चार दिवसांपासून मुंबई तळ ठोकला आहे. गुरुवारी (ता.२४) शरद पवारांची भेट होऊ शकली नाही. शुक्रवारी त्यांच्या भेटीसाठी हे इच्छुक चेहरे आसुलेले होते.

विधानसभा निवडणुकीच्या प्रक्रियेला आता चांगलीच गती आली आहे. निवडणुकीच्या टप्यांमधील उमेदवारी अर्ज दाखल करण्याची महत्त्वाची प्रक्रिया सुरु आहे. याच दरम्यान प्रमुख पक्षांसह काही छोट्या पक्षांकडून उमेदवाऱ्या जाहीर केल्या जात आहेत. राष्ट्रवादी शरदचंद्र पवार गटानं उमेदवारांची पहिली यादी जाहीर केली. करमाळा आणि सोलापूर शहर उत्तर विधानसभेसाठी आपले उमेदवार घोषित केले.

मात्र, हे करताना पंढरपूर, मोहोळ, माळशिरस आणि माढ्याच्या उमेदवारीचा निर्णय शरद पवारांनी मागे राखला आहे. या मतदार संघामधून इच्छुक असणाऱ्या संबंधितांना उमेदवारीबद्दल मोठी आशा आहे. त्यातून उमेदवारीसंबंधीचा एबी फॉर्म घेऊन मतदार संघात जायचं या इराद्याने इच्छुक उमेदवारांनी मुंबईत मुक्काम ठोकला आहे.

### पवार भेटले अन् म्हणाले...

शरद पवार यांची मागच्या दोन दिवसांपासून भेट झाली नव्हती. सुरुवातील सिल्व्हर ओक या निवासस्थानी सोलापूर जिल्ह्यातील इच्छुक पवारांच्या भेटीसाठी गेले. मात्र त्यांची तेथे भेट होवू शकली नाही. वाय.जी.चव्हाण सेंटला साहेब येतील, तिथे भेटा असा निरोप देण्यात आला. त्यानुसार, इच्छुकांनी अक्षरश: देवासारखी शरद पवारांची वाट अनेक तास पाहिली. शेवटी शरद पवार तिथे आले. शुक्रवारीच (ता.२५) यादी घोषित होईल, तुमचे काम होईल, असे पवार यांनी सांगून टाकले. त्यावर इच्छुक माघारी परतले. मात्र, यादी जाहीर झाल्यानंतरदेखील एबी फॉर्म घेऊन जावुया, असे ठरवून संबंधितण मुंबईत थांबले आहेत.

# शिंदे-फडणवीसांच्या रस्सीखेचात राऊतांची उमेदवारी लटकली?



✔ सोलापूर/प्रतिनिधी

बहुचर्चित आणि व्हायव्होलटेज ड्रामा होणाऱ्या बार्शी विधानसभेच्या आखाड्यात माजी आमदार दिलीप सोपल आणि विद्यमान आमदार राजेंद्र राऊत यांच्यामध्ये कडवी झुंज होणार असल्याचं निश्चित असलं तरी महायुतीमधील घटक पक्ष भाजप आणि एकनाथ शिंदे शिवसेनेची बार्शीची जागा घेण्यावरुन प्रचंड रस्सीखेच सुरु असल्याची माहिती समोर आली असून यामध्ये आमदार राऊत यांच्या भाजपकडून जाहीर होणाऱ्या उमेदवारीला मोठा ब्रेक लागला असल्याचं कळतं.

बार्शी विधानसभेच्या मतदार संघातून आमदार राऊत हे पाठीमागच्या २०१९ च्या निवडणुकीत अपक्ष म्हणून निवडून आले असली तरी त्यांनी भाजपला समर्थन दिल होतं. त्यामुळे बार्शीच्या जागेवर भाजपचा उमदेवार म्हणून त्यांनी दावा केला होता. शिवाय भाजपच्या उमेदवारीवरच निवडणूक लढणार, असे जाहीर केले आहे.

मात्र, महायुतीच्या जागा वाटपात स्वत:च्या वाट्याला असलेली जागा एकनाथ शिंदे शिवसेना गट सोडायला तयार नाही. त्यामुळं बार्शीच्या जागेवर भाजप आणि शिंदे सेना यांच्यामध्ये पेच निर्माण झाला आहे. असं असले तरी भाजपच्या 'कमळ' चिन्हावर निवडणूक लढविण्यावर राऊत ठाम आहेत.

सन २०१९ मध्ये बार्शी, करमाळा, सोलापूर शहर मध्य, सांगोला आणि मोहोळ या पाच ठिकाणी शिवसेना लढली होती. सांगोल्यात केवळ विजय मिळाला होता. शहाजी पाटील हे निवडून आले होते.

### भाजपकडं जागा सोडवून घेण्याचा घाट

महायुतीच्या जागा वाटपात बार्शीची जागा सोडवून घेण्यासाठी भाजपचे मोठे प्रयत्न सुरु आहेत. मात्र दुसऱ्या बाजूला शिंदे सेनेनेदेखील या जागेवरुन प्रकरण ताणलं आहे. त्यात राऊत यांची उमेदवारी पहिल्या विद्यमान आमदारांच्या यादीतून जाहीर होऊ शकली नाही. जागा सोडवून घेण्यासह आमदार राऊत यांना उमेदवारी देण्याच्या हालचाली भाजपकडून केल्या जात आहेत.